दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## सीबीएसईच्या तीन-भाषा धोरणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान; तातडीच्या सुनावणीची मागणी

नवी दिल्ली, 04 ऑगस्ट : सीबीएसईच्या नववीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आलेल्या तीन-भाषा धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वतीने मंगळवारी ज्येष्ठ अधिवक्ता गोपाल शंकरनारायणन यांनी सरन्यायमूर्ती सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य

## खासगी गाडीवर 'पोलीस' स्टिकर लावल्यास होणार जप्त

**मुंबई :** महाराष्ट्रात कोणत्याही खासगी वाहनावर 'पोलीस' किंवा शासकीय बोधचिन्ह लावणे, हा कायदेशीर गुन्हाच आहे. तरीही अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी कायदा पायदळी तुडवून आपल्या खासगी वाहनांवर तसे स्टीकर लावत असतात. अशांना वठणीवर आणण्यासाठी महाराष्ट्र पोलीस प्रमुखांनी विशेष सूचना जारी केलीये. असे स्टीकर कुठल्याही गाडीवर दिसल्यास ती गाड्या त्वरित जप्त कराव्यात आणि दंड ठोठावावा, असं या सूचनेत स्पष्ट केलंय. हा नियम पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्वतःच्या खासगी वाहनांनाही समान लागू आहे.

## थोडक्यात वार्ता

### आसारामच्या वैद्यकीय जामिनावर 6 ऑगस्ट रोजी सुनावणी

**नवी दिल्ली, 04 ऑगस्ट :** जोधपूरमधील अल्पवयीन विद्यार्थिनीवरील बलात्कार प्रकरणात दोषी ठरलेल्या आसाराम बापूंच्या अंतरिम वैद्यकीय जामिनाच्या अर्जावर सर्वोच्च न्यायालय ६ ऑगस्ट रोजी सुनावणी घेणार आहे. दरम्यान, एम्सनेआपला वैद्यकीय अहवाल न्यायालयाला सादर केला आहे. या अहवालानुसार, आसाराम बापूंना सध्या रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नाही, पण त्यांच्यावर २४ तास वैद्यकीय देखरेख ठेवणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने अहवालाचे पुनरावलोकन करताना त्यातील काही मुद्द्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सुनावणीदरम्यान त्यांचे आरोग्य, वैद्यकीय अहवाल आणि जामिनाचा अर्ज हे महत्त्वाचे मुद्दे असतील. मागील सुनावणीदरम्यान, राजस्थान सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, आसाराम बापू पूर्णपणे निरोगी असून त्यांनी तीन महिन्यांपूर्वी अयोध्या आणि काशी विश्वनाथला भेट दिली होती. मेहता यांनी सांगितले की, ते सर्वत्र चालत आणि प्रवास करत होते. ३० जून रोजी आसारामच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने राजस्थान सरकारला नोटीस बजावली होती. सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापू यांना दिलेली शिक्षा स्थगित करण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापू यांना तुरुंगात पुरवण्यात येत असलेल्या वैद्यकीय सुविधा सुरू ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या आरोग्याला गंभीर धोका असेल तरच जामीन मंजूर करण्याचा विचार केला जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

### पीएचडी विभागाच्या उपकुलसचिवपदी भगवान फड

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील परीक्षा विभागातील सहाय्य कुलसचिव भगवान नारायणराव फड यांची उपकुलसचिवपदी पदोन्नती करण्यात आली आहे. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या आदेशाने ही पदोन्नती करण्यात आली. भगवान फड हे गेल्या २२ वर्षापासून विद्यापीठात कार्यरत आहेत. या काळात त्यांनी टंकलेखक, लिपीक, वरिष्ठ सहायक, कक्षाधिकारी, सहायक कुलसचिव आदी पदांवर कार्य केले आहे. कृष्णा दाभाडे यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या उपकुलसचिवपदी त्यांची पदोन्नतीने नियुक्ती आली. पीएचडी विभागाचे उपकुलसचिव म्हणून भगवान फड हे काम करणार आहेत.

### अभिजीत गायकवाड यांची 'मंत्रालय MIS समन्वयक' पदी नियुक्ती

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



खुलताबाद प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण)' (VB-G RAM G) अंतर्गत नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या 'महा वृक्षलागवड कक्ष' मध्ये श्री अभिजीत भाऊसाहेब गायकवाड यांची मंत्रालय MIS समन्वयक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.*

* राज्यात राबविण्यात येत असलेल्या ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे (२०२६-२०४७) प्रभावी नियोजन, समन्वय, माहिती संकलन, प्रगतीचा आढावा आणि अहवालनिर्मिती करण्याचे महत्त्वाचे कामकाज या कक्षाद्वारे चालणार आहे.*

## "शाल जोडे"






# खड्ड्यांत हरवले शहराचे रस्ते; प्रशासनाची उदासीनता पुन्हा उघड

# मध्यवर्ती बसस्थानकासमोरील महाखड्ड्यामुळे अपघाताचा धोका वाढला; दररोज हजारो नागरिकांचा जीव मुठीत धरून प्रवास

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर









**छत्रपती संभाजीनगर :** शहरात झालेल्या अल्प पावसानंतरच रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते आणि विशेषतः मध्यवर्ती बसस्थानकासमोरील मार्गावर पडलेल्या महाखड्ड्यामुळे दररोज हजारो वाहनचालक, बस प्रवासी, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सुरक्षेच्या नावाखाली बॅरिकेट्स उभारण्यात आले असले तरी कायमस्वरूपी दुरुस्तीचा पत्ता नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

शहरातील रस्त्यांची गुणवत्ता पुन्हा एकदा प्रश्नचिन्हाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अवघ्या काही दिवसांच्या पावसातच क्रांती चौक, सिडको, बाबा पेट्रोल पंप, रेल्वे स्टेशन, अशा बऱ्याच प्रमुख चौकांमध्ये मोठमोठे खड्डे पडले आहेत. बसस्थानकासमोरील रस्त्यावर पडलेला महाखड्डा हा केवळ वाहतुकीचाच नव्हे तर नागरिकांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न बनला आहे.

या मार्गावरून दररोज हजारो शहर बस, एसटी बस, रिक्षा, दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहने ये-जा करतात. याच रस्त्याने बाबा पेट्रोल पंप, रेल्वेस्थानक व शहरातील विविध भागांकडे जाणारी वाहतूक सुरू असते. मात्र खड्ड्याभोवती उभारण्यात आलेल्या बॅरिकेट्समुळे रस्ता अरुंद झाला असून दिवसभर वाहतूक कोंडी होत आहे. वाहनचालकांना खड्डा चुकवण्यासाठी अचानक दिशा बदलावी लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

> **"बसमध्ये प्रवास करताना प्रत्येक खड्ड्यावर जोराचे धक्के बसतात. रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांची अवस्था पाहवत नाही. तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती झाली पाहिजे."**
>
> **— बस प्रवासी**

> **"खड्डा चुकवताना अचानक वाहन वळवावे लागते. त्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. बॅरिकेट्स लावून प्रश्न सुटणार नाही."**
>
> **— सचिन गायकवाड दुचाकीस्वार**

विशेष म्हणजे, बसमधून प्रवास करणाऱ्या रुग्णांना आणि ज्येष्ठ नागरिकांना या खड्ड्यांचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. बस खड्ड्यातून जाताना बसणाऱ्या धक्क्यांमुळे रुग्णांच्या वेदना वाढतात, तर विद्यार्थी आणि महिला प्रवाशांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. दुचाकीस्वारांसाठी तर पावसाच्या पाण्याखाली लपलेले खड्डे जीवघेणे ठरत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरात अद्याप मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला नसतानाही रस्त्यांची अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यांच्या कामांच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरवर्षी रस्त्यांच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो, मात्र पहिल्याच पावसात रस्ते उखडत असतील तर त्या कामांची गुणवत्ता तपासणार कोण, असा सवाल नागरिक करत आहेत.

सध्या संबंधित विभागाकडून काही ठिकाणी खड्ड्यांभोवती बॅरिकेट्स लावून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र नागरिकांच्या मते, हा उपाय केवळ दिखाऊ असून कायमस्वरूपी दुरुस्तीशिवाय समस्या सुटणार नाही. प्रत्येक पावसाळ्यात याच पद्धतीने खड्डे बुजविण्याचे नाटक होते आणि काही दिवसांत पुन्हा तीच परिस्थिती निर्माण होते, अशीही टीका नागरिकांनी केली.

शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासारख्या महत्त्वाच्या ठिकाणीच रस्त्यांची अशी अवस्था असेल तर इतर भागातील परिस्थिती किती गंभीर असेल, याचा सहज अंदाज येतो. एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

## जायकवाडी धरणाचे 18 दरवाजे उघडून गोदावरी नदीपात्रात 10 हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग

### नदीकाठच्या गावांना प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यासह मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या जायकवाडी धरणाच्या (नाथसागर) पाणीपातळीत वाढ झाल्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणाचे १८ दरवाजे अर्ध्या फुटाने उघडून त्यातून गोदावरी नदीपात्रात तब्बल १० हजार क्युसेक इतक्या वेगाने पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत आहे. धरणात आवक सतत सुरू असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला असून, प्रशासनाकडून गोदावरी नदीकाठच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी धरण क्षेत्रात आणि धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये होत असलेल्या पावसामुळे धरणात पाण्याची आवक सातत्याने वाढली आहे. पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आणि धरणाची सुरक्षितता कायम राखण्यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. १८ दरवाज्यांमधून १० हजार क्युसेक वेगाने पाणी गोदावरी नदीत सोडण्यात येत असल्याने नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने गोदावरी नदीकाठच्या छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि इतर लगतच्या जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांना हाय अलर्ट जारी केला आहे. नदीपात्रात पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये, जनावरे किंवा शेतीचे साहित्य नदीकाठावरून तात्काळ हलवावे, तसेच कुणीही सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि जलसंपदा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पूरपरिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## शहरासह मराठवाड्याला दर्जेदार आरोग्य सुविधा द्या : खा.संदिपान भूमरे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**नवी दिल्ली :** छत्रपती संभाजीनगर व मराठवाड्यातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि प्रभावी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार संदिपान भूमरे यांनी केंद्रीय आयुष (स्वतंत्र कार्यभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत केली.

कर्तव्य भवन येथे झालेल्या बैठकीत आयुष मंत्रालय आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या विविध योजना व त्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार भूमरे यांनी आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह केंद्र शासनाच्या सर्व आरोग्य योजनांचा लाभ पात्र रुग्णांना कोणतीही अडचण, विलंब किंवा अनावश्यक कागदपत्रांशिवाय तातडीने मिळावा, अशी मागणी केली.

छत्रपती संभाजीनगर येथे अत्याधुनिक आयुष रुग्णालय उभारून आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध, होमिओपॅथी आणि निसर्गोपचाराच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच आयुष व आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतींचा समन्वय वाढवून ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. मराठवाड्यातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण, आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता वाढविणे आणि केंद्राच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही त्यांनी केली.

राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी खासदारांनी मांडलेल्या मागण्यांची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. बैठकीस मराठवाड्यातील खासदार, आयुष व आरोग्य मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष पदी मा आ. बोर्डीकर तर उपाध्यक्ष पदी राजेश गोरेगावकर



हिंदु प्रकाश वार्ता./अशोक पवार

**परभणी :-** मराठवाड्यात परभणी जिल्हा व हिंगोली जिल्ह्यासाठी संयुक्तरीत्या असलेल्या परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक आता पूर्ण झाली असून तीन ऑगस्ट 2026 रोजी निवडीत माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर अध्यक्ष तर उपाध्यक्ष म्हणून राजेश भैय्या गोरेगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी दिनांक 3 ऑगस्ट 2026 रोजी संचालकाची बैठक बोलवण्यात आली होती या वेळी अध्यक्षपदाच्या निवडीसाठी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी अर्ज दाखल केला होता राजेश भैय्या गोरेगावकर व आ. सईद खान यांनी अर्ज दाखल केला होता. तर जोडीचा राजकारणातून ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर राजेश विटेकर आमदार राहुल पाटील आमदार यांच्यासह अनेक नेत्यांनी भविष्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राचा व जिल्ह्याचा आर्थिक विकास करता यावा यासाठी एकत्र येऊन तडतडूच्या माध्यमातून बिनविरोध अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवड करण्याचे निश्चित केले यातूनच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी मा आ रामप्रसाद बोर्डीकर यांची तर राजेश भैय्या गोरेगावकर यांची निवड करण्यात आली यामध्ये विशेष म्हणजे माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांना सहकार क्षेत्रातला प्रदीर्घ अनुभव असून गेल्या 35 वर्षापासून हे या बँकेचे संचालक आहेत तर याच बँकेवर अध्यक्ष म्हणून कार्यरत होते काही वर्षापासून बँकेच्या प्रशासनात तसेच नियोजनापासून दूर राहिलेले पुन्हा आज बँकेचे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला आहे

या निवडीबद्दल जिल्ह्यातून अध्यक्ष उपाध्यक्ष यांचे अभिनंदन होत असून सर्व संचालकांना विश्वासात घेऊन पुढे या बँकेच्या व ग्राहकांच्या हितासाठी काम केले जाईल अशी प्रतिक्रिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रामप्रसाद बोर्डीकर यांनी दिली

## स्तनपान जनजागृतीसाठी मनपाचा पुढाकार; नर्सिंग स्टाफला विशेष प्रशिक्षण

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी





**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त (१ ते ७ ऑगस्ट) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे स्तनपानाबाबत जनजागृती आणि प्रभावी समुपदेशनासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यावर्षीच्या "शाश्वत जीवनाच्या सुरुवातीसाठी स्तनपान - जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करा" या ब्रीदवाक्यानुसार मंगळवारी (४ ऑगस्ट) मनपा आरोग्य केंद्रांतील नर्सिंग स्टाफसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या संकल्पनेतून आयएमए हॉल येथे दुपारी ३ ते ५ या वेळेत झालेल्या या कार्यशाळेत शहरातील विविध आरोग्य केंद्रांतील १५१ नर्सिंग कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

"For Successful Breast-feeding – Catch Them Early" या विषयावर आयोजित कार्यशाळेत बालरोगतज्ज्ञ व स्तनपान समुपदेशक डॉ. रोशनी सोधी यांनी मार्गदर्शन केले. जन्मानंतर एका तासाच्या आत बाळाला स्तनपान सुरू करण्याचे महत्त्व, गर्भधारणेच्या काळातच मातेला स्तनपानाबाबत योग्य माहिती व मानसिक तयारी करून देण्याची गरज, तसेच नवजात बालकाला योग्य पद्धतीने स्तनाला लावण्याची प्रक्रिया, बेबी क्रॉल, आईचा आहार आणि प्रभावी समुपदेशन याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

पीपीटी व व्हिडिओच्या माध्यमातून संवादात्मक पद्धतीने विषय मांडत उपस्थित नर्सिंग स्टाफच्या शंकांचे निरसन करण्यात आले. गरोदरपणातच मातांपर्यंत स्तनपानाविषयी योग्य माहिती पोहोचविल्यास जन्मानंतर तातडीने स्तनपान सुरू होण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये गरोदर व स्तनदा मातांना स्तनपानाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा उपक्रम केवळ स्तनपान सप्ताहापुरता मर्यादित न ठेवता वर्षभर सातत्याने राबविण्यात येणार असून स्तनपानाविषयी जनजागृती आणि समुपदेशनाची सेवा नियमित सुरू राहणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मेघा जोगदंड, बन्सीलालनगर रुग्णालयातील कर्मचारी तसेच मनपा मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## 'अश्वत्थामा' ते 'गझनी'चा व्हिलन : एक अष्टपैलू अभिनयपर्व संपले

बी. आर. चोप्रा यांच्या अजरामर 'महाभारत' मालिकेत अश्वत्थामाची भूमिका साकारून घराघरांत पोहोचलेले आणि 'लगान', 'गझनी' अशा अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते प्रदीप रावत यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी प्रदीर्घ लढा दिल्यानंतर ४ ऑगस्ट रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने भारतीय सिनेसृष्टीने आणि विशेषतः भारतीय पडद्यावरील खलनायकी (Villain) व्यक्तिरेखांना एक नवी उंची मिळवून देणारा एक अत्यंत तगडा, कणखर आणि सशक्त अभिनेता गमावला आहे. प्रदीप रावत यांचा अभिनयप्रवास हा अत्यंत वैविध्यपूर्ण आणि थक्क करणारा राहिला. 'महाभारत' मालिकेतील त्यांची 'अश्वत्थामा' ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या स्मरणात कायमची कोरली गेली. त्यानंतर त्यांनी केवळ टीव्हीपुरते मर्यादित न राहता हिंदी, तेलुगु, तमिळ, कन्नड, मल्याळम, बंगाली आणि भोजपुरी अशा तब्बल सात ते आठ भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करून आपल्या अष्टपैलू कौशल्याची चुणूक दाखवली. 'लगान'मधील 'देवा', 'सरफरोश'मधील व्यक्तिरेखा, सलमान खानसोबतचे चित्रपट किंवा 'ग्रँड मस्ती' आणि 'छावा'सारखे सिनेमा असोत; प्रत्येक भूमिकेत त्यांनी स्वतःचा वेगळा प्रभाव पाडला. भारतीय सिनेसृष्टीत 'गझनी' या चित्रपटाने इतिहास घडवला, आणि या यशाचा एक मोठा वाटा प्रदीप रावत यांच्याकडे जातो. तमिळ आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमधील 'गझनी' चित्रपटात त्यांनी साकारलेली मुख्य खलनायकाची भूमिका (Title Role) अत्यंत क्रूर, तितकीच धाकधूक वाढवणारी आणि जबरदस्त होती. नायक जेवढा मजबूत, तेवढाच खलनायक ताकदीचा असावा लागतो; हा नियम त्यांनी आपल्या अभिनयाने खरा ठरवला. दाक्षिणात्य सिनेसृष्टीत, विशेषतः तेलुगु चित्रपट 'सई'मधून त्यांनी ज्या प्रकारे पुनरागमन केले, त्यानंतर दक्षिण भारतातील चित्रपटांमध्ये मुख्य व्हिलन म्हणून त्यांची एक वेगळीच ओळख निर्माण झाली होती. गेल्या काही महिन्यांपासून कर्करोगावर उपचार घेत असताना त्यांनी धैर्याने आजाराचा सामना केला. अभिनेते यशपाल शर्मा आणि त्यांच्या व्यवस्थापकांनी त्यांच्या निधनाची माहिती दिल्यानंतर सिनेसृष्टीतून तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. पडद्यावर अत्यंत कठोर आणि भीतीदायक वाटणारे प्रदीप रावत वैयक्तिक आयुष्यात अत्यंत संयमी आणि कामाशी एकनिष्ठ असणारे कलावंत होते. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटांमधील एका विशिष्ट प्रवासाचा अंत झाला आहे. प्रदीप रावत यांच्या रूपाने एक अष्टपैलू आणि प्रयोगशील कलाकार काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांनी साकारलेल्या अजरामर भूमिकांच्या माध्यमातून ते प्रेक्षकांच्या मनात सदैव जिवंत राहतील.

# रोडरोमिओंवर ग्रामीण पोलिसांचा प्रहार

### ऑल आऊट ऑपरेशन' अंतर्गत शाळा-महाविद्यालय परिसरातील 32 टवाळखोरांवर कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी ३ आणि ४ ऑगस्ट या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात विशेष 'ऑल आऊट ऑपरेशन' प्रभावीपणे राबवले. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, बसस्थानके तसेच महिला व मुलींची वर्दळ असलेल्या सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या मोहिमेदरम्यान जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांच्या अधिकारी व अंमलदारांनी शाळा व महाविद्यालय परिसरात विशेष गस्त घालून महिला व विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्या, टवाळखोरी करणाऱ्या आणि सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तन करणाऱ्या रोडरोमिओंविरुद्ध धडक कारवाई केली.

या विशेष मोहिमेत शाळा व महाविद्यालय परिसरात टवाळखोरी करणाऱ्या एकूण ३२ व्यक्तींविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियमातील कलम ११० व ११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अशा प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये कायद्याचा




धाक निर्माण झाला असून, महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाची कटिबद्धता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

महिलांच्या सुरक्षिततेबरोबरच अवैध धंदे आणि कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्या व्यक्तींवरही या मोहिमेत विशेष भर देण्यात आला. अवैधरित्या व चोराट्या मार्गाने दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करून आरोपींवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत देशी-विदेशी दारूच्या बाटल्या, गावठी हातभट्टी दारू, रसायन, ड्रम आणि दारू साठविण्याचे साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये (प्रोहिबिशन कायदा) विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय, दारूबंदी प्रतिबंधात्मक कारवाई अंतर्गत कलम ८५[१] नुसार ८ कारवाया करण्यात आल्या. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अवैधरित्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांविरुद्धही पोलिसांची कडक मोहीम राबवली. कोटपा (COTPA) कायद्यांतर्गत ५८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, सिगारेट व अन्य विक्री उत्पादने अधिनियमाच्या कलम ६(ब) आणि २४ अन्वये ५८ आरोपींवर कारवाई करत १९ हजार ६४७ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच जिल्हाभर राबविण्यात आलेल्या या सर्वसमावेशक मोहिमेत एकूण ११३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १४७ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच या संपूर्ण कारवाईदरम्यान एकूण ४ लाख १२ हजार ३२७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## क्रांतीसिंह नाना पाटील यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात अभिवादन

हिंदु प्रकाश वार्ता. / प्रतिनिधी



**परभणी :**-महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीतील थोर स्वातंत्र्यसैनिक, शेतकरी नेते आणि प्रतिसरकार चळवळीचे जनक क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या सिम्पोजियम सभागृहात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते. त्यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे तसेच कुलसचिव श्री. पुरभा काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात उपकुलसचिव (सामान्य प्रशासन) श्री. पद्माकर पाटील यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जीवनकार्याचा अल्प परिचय करून दिला. त्यांनी सांगितले की, क्रांतीसिंह नाना पाटील यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्भीडपणे लढा देत प्रतिसरकार या ऐतिहासिक लोकशाही व्यवस्थेची स्थापना केली. सामाजिक न्याय, शेतकरी कल्याण, स्वातंत्र्य, समता आणि जनसामान्यांच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे कार्य आजही राष्ट्रप्रेम, लोकशाही मूल्ये आणि समाजसेवेची प्रेरणा देणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रशासकीय इमारतीतील विविध कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले व त्यांच्या राष्ट्रसेवा, त्याग आणि स्वातंत्र्यलढ्यातील अमूल्य योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

### 15 ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुख्य शासकीय ध्वजारोहण

# स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा

### 'हर घर तिरंगा' अभियानाच्या यशस्वीतेसाठी विविध विभागांना सूचना



हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:**– भारताचा 80 वा स्वातंत्र्यदिन उत्साहात आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. 15 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 9.05 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी आढावा बैठक संपन्न झाली.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या बैठकीस महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते.

बैठकीत स्वातंत्र्यदिन समारंभाचे नियोजन, ध्वजारोहण स्थळावरील आवश्यक सुविधा, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, स्वच्छता, वीजपुरवठा, आरोग्य सुविधा तसेच विविध विभागांमधील समन्वय आदी मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

समारंभ शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी महानगरपालिका, पोलीस विभाग, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसील कार्यालय, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. प्रत्येक विभागाने आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करून समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

१४ ऑगस्ट २०२६ रोजी देशभर 'फाळणी स्मरण दिवस' पाळण्यात येणार आहे. फाळणीच्या वेदनादायी इतिहासाची जाणीव विशेषतः तरुण पिढीला करून देणे तसेच प्रभावित झालेल्या लाखो नागरिकांच्या त्याग आणि जिद्दीला अभिवादन करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

तसेच दि. 9 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट 2026 या कालावधीत देशभर राबविण्यात येणाऱ्या 'हर घर तिरंगा' अभियानाचाही आढावा घेण्यात आला. यंदाचा उपक्रम 'वंदे मातरम्' गीताच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ समर्पित असून, विविध जनजागृती कार्यक्रमांसह वंदे मातरम गायनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाचा सहभाग वाढविण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या अनुषंगाने बाईक रॅली, विविध स्पर्धा, जनजागृती कार्यक्रम, प्रभात फेऱ्या तसेच राष्ट्रध्वजाबाबत जनजागृती करणारे विविध उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या. शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच नागरिकांनी मोठ्या उत्साहाने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय समारंभ तसेच 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बैठकीत दिले.

## महाराष्ट्रातील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**मुंबई:** भारताच्या निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाबाबत (Special Intensive Revision - SIR) सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. १ ऑक्टोबर २०२६ ही अर्हता तारीख गृहीत धरून हे पुनरीक्षण केले जात आहे. यासंदर्भातील पत्र ४ ऑगस्ट २०२६ रोजी निवडणूक आयोगाचे अवर सचिव संदीप कुमार यांनी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवले आहे.

या सुधारित वेळापत्रकानुसार, बूथ लेव्हल ऑफिसरतर्फे (BLO) घराघरांना भेट देऊन पडताळणी करण्याचे काम ३० जून २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत चालणार आहे. त्यानंतर १७ ऑगस्ट २०२६ रोजी पोलिंग स्टेशनचे सुसूत्रीकरण किंवा पुनर्रचना केली जाईल. मसुदा मतदारयादी (Draft Publication) २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल. मसुदा जाहीर झाल्यानंतर २४ ऑगस्ट २०२६ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करता येणार आहेत. यानंतर २४ ऑगस्ट २०२६ ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नोटीस टप्पा आणि प्राप्त झालेले दावे व हरकती निकाली काढण्याचे काम चालणार असून, अंतिम मतदारयादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

## पंजाबमध्ये आयएसआय-समर्थित दोन दहशतवादी गटांचा भंडाफोड

**चंदीगड :** पंजाबमधील अमृतसर पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या पाठिंब्याने कार्यरत असलेल्या दोन दहशतवादी गटांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत 4 अल्पवयीन मुलांसह एकूण 9 आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून तीन बेकायदेशीर पिस्तूल, 9 जिवंत काडतुसे आणि पेट्रोलच्या चार बाटल्या जप्त करण्यात आल्या.

पंजाब पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, अटक केलेले आरोपी परदेशातील आयएसआयच्या सूत्रधारांच्या संपर्कात होते आणि त्यांच्या सूचनेनुसार काम करत होते. या तरुणांना दहशतवादी कारवायांसाठी तयार केले जात होते. त्यांना सुरक्षा यंत्रणांची टेहळणी करणे, बेकायदेशीर शस्त्रे मिळवणे आणि पंजाबमधील शांतता व कायदा-सुव्यवस्था बिघडवणे यांसारखी कामे सोपवण्यात आली होती. पोलिसांनी केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, आरोपींनी रेल्वे रुळांजवळ पाळत ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. या कॅमेऱ्यांमधून रेकॉर्ड केलेले फुटेज संवेदनशील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी परदेशी आयएसआयच्या सूत्रधारांना पाठवले जात असल्याचा आरोप आहे. सुमारे महिनाभरापूर्वी, अमृतसर-दिल्ली रेल्वे मार्गावरील एका ओव्हरहेड विद्युत खांबावर एक सीसीटीव्ही कॅमेरा आढळून आला होता.

कॅमेऱ्याला वीजपुरवठा करण्यासाठी एक सोलर पॅनलदेखील बसवण्यात आले होते. तपासादरम्यान, पोलिसांना कॅमेऱ्याच्या सिम कार्ड स्लॉटमध्ये गुरदेवच्या नावावर नोंदणीकृत असलेले एक सिम कार्ड आढळले. याच्या आधारे पोलिसांनी गुरदेवला अटक केली.

# जिल्ह्यातील सर्व खासगी आरोग्य संस्थांनी ABDM अंतर्गत नोंदणी करावी; नागरिकांनी ABHA कार्ड तयार करून घ्यावे

### जिल्हाधिकारी विनय गौडा व मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) अंतर्गत जिल्ह्यातील सर्व खासगी रुग्णालये, क्लिनिक, प्रयोगशाळा, रक्तपेढ्या, मेडिकल स्टोअर्स, इमेजिंग सेंटर तसेच बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट (BNHA) अंतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य संस्थांनी तातडीने नोंदणी पूर्ण करावी आणि नागरिकांचे ABHA (आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट) कार्ड तयार करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) ही भारत सरकारच्या नॅशनल हेल्थ अथॉरिटी (NHA) मार्फत राबविण्यात येणारी महत्त्वाकांक्षी योजना असून देशातील प्रत्येक नागरिकासाठी सुरक्षित, सक्षम आणि एकात्मिक डिजिटल आरोग्य व्यवस्था निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाअंतर्गत प्रत्येक नागरिकाला १४ अंकी ABHA (Ayushman Bharat Health Account) क्रमांक दिला जातो. या क्रमांकाद्वारे वैद्यकीय नोंदी, तपासणी अहवाल, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन आणि इतर आरोग्यविषयक माहिती सुरक्षितपणे डिजिटल स्वरूपात उपलब्ध राहते. रुग्णाच्या स्पष्ट संमतीशिवाय कोणतीही माहिती इतरांसोबत शेअर केली जात नसल्याने गोपनीयता आणि सुरक्षितता कायम राखली जाते.

जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांची Health Facility Registry (HFR) तसेच वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिकांची Health Professional Registry (HPR) मधील नोंदणी पूर्ण झाली असून नागरिकांची ABHA कार्डे तयार करण्याचे काम नियमितपणे सुरू आहे.

यापुढे जिल्ह्यातील सर्व खासगी रुग्णालये, क्लिनिक, डायग्नोस्टिक सेंटर, प्रयोगशाळा, रक्तपेढ्या, मेडिकल स्टोअर्स, एक्स-रे व एमआरआय केंद्रांसह BNHA अंतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य संस्थांनी HFR व HPR नोंदणी तातडीने पूर्ण करावी. संबंधित संस्थांनी नोंदणी करून प्राप्त नोंदणी क्रमांक abdmcocsn@gmail.com या ई-मेलवर जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे पाठवावा. तसेच नोंदणी प्रक्रियेसाठी भेट देणाऱ्या शासकीय आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी ABHA मोबाईल ॲपद्वारे किंवा जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत आधार कार्डच्या सहाय्याने ABHA कार्ड तयार करून घ्यावे. तसेच पात्र लाभार्थ्यांनी PM-JAY (आयुष्मान भारत) कार्डही काढून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## सेलू तालुक्यात एसआयआर मोहिमेला वेग; 94 टक्के मतदारांचे डिजिटायझेशन पूर्ण

### उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सेलू तालुक्यात मतदार याद्यांचे काम वेगाने सुरू असून 1 लाख 45 हजार 592 मतदारांपैकी सर्वांना गणना फॉर्म वितरित करण्यात आले आहेत. त्यापैकी 1 लाख 38 हजार 170 (94.90 टक्के) मतदारांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी दिले.

यासंदर्भात 30 जुलै व 3 ऑगस्ट रोजी सेलू येथे स्वतंत्र बैठका घेऊन सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, बीएलओ व पर्यवेक्षकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटायझेशनचे काम तातडीने पूर्ण करून पुढील पाच ते सहा दिवसांत संबंधित सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत अनमॅप्ड, अनॉमली, वय, जन्मतारीख, नाव अथवा लिंगातील त्रुटी असलेल्या मतदारांची माहिती अचूक करण्यासाठी बीएलओ ॲपवरील पर्यायाचा वापर करून आवश्यक दुरुस्त्या करण्याचे निर्देश देण्यात आले.

मयत, स्थलांतरित व दुबार मतदारांच्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रे व पंचनामा अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्या मतदारांचे फॉर्म डिजिटायझेशन होत नाहीत, त्यांच्या त्रुटी ओळखून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सुनावणीवेळी सादर करण्याबाबतही बीएलओंना मार्गदर्शन करण्यात आले.

प्रारूप मतदार यादी 17 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार असून त्यानंतर प्राप्त दावे व हरकतींवर सुनावण्या घेऊन कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. अंतिम मतदार यादी 19 ऑक्टोबर 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकीस तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. शिवाजी मगर, नायब तहसीलदार गजानन इनामदार, नायब तहसीलदार (निवडणूक) श्रीमती कोल्हे तसेच सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, बीएलओ व पर्यवेक्षक उपस्थित होते.

# अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी तातडीने 200 कोटींचा निधी मंजूर करा; व्यावसायिक कर्ज योजना पुन्हा सुरु करा – राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी शासनाने तातडीने २०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करावा, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम त्वरित वितरित करावी, केंद्र शासनाने बंद केलेले मौलाना आझाद एज्युकेशन फाऊंडेशन (MAEF) पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाने पाठपुरावा करावा तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत व्यावसायिक कर्ज योजना तात्काळ सुरू करून प्रलंबित अर्जांचा निपटारा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अल्पसंख्याक विभागातर्फे करण्यात आली.

या मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री यांना उद्देशून अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असताना केवळ ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानंतर अतिरिक्त ९० कोटी रुपयांच्या निधीची मागणीही मंजूर न झाल्याने राज्यातील हजारो अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती वेळेवर मिळालेली नाही. त्यामुळे मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारशी समाजातील उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर आर्थिक तसेच मानसिक ताण वाढत असून अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षणही



धोक्यात आले आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, केंद्र शासनाने बंद केलेले मौलाना आझाद एज्युकेशन फाऊंडेशन (MAEF) पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे प्रभावी पाठपुरावा करावा. तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा.

जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांनी सांगितले की, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी शासनाने केवळ घोषणा करून न थांबता योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती, स्वयंरोजगार आणि आर्थिक सहाय्याच्या योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिल्यास हजारो विद्यार्थी, युवक आणि लघुउद्योजकांना मोठा दिलासा मिळेल.

ते पुढे म्हणाले की, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत दिले जाणारे व्यावसायिक कर्ज २०१४ पासून प्रभावीपणे बंद असल्याने अनेक सुशिक्षित बेरोजगार युवक, महिला आणि लघुउद्योजकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळत नाही. शासनाने ही कर्ज योजना तातडीने पुन्हा सुरू करून पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे हजारो युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, नवीन उद्योग-व्यवसाय सुरू होतील आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल. अल्पसंख्याक समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास राज्याच्या विकासालाही गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष रज्जाक पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन, प्रदेश सरचिटणीस वाजेद असलम, जिल्हा कोषाध्यक्ष शेख सलीम, जिल्हा सरचिटणीस मिर्झा अनिस बेग, शहर युवक उपाध्यक्ष अश्फाक जमील खान यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# खासदार डॉ. रामराव वडकुते यांचे केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्याकडे निवेदन

## हिंगोली जिल्ह्यात अत्याधुनिक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याची केली मागणी

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यातील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने राज्यसभा खासदार डॉ. रामराव वडकुते यांनी आज संसद भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री मा. रक्षाताई खडसे यांची भेट घेऊन हिंगोली जिल्ह्यात अत्याधुनिक बहुउद्देशीय स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याबाबतचे सविस्तर निवेदन सादर केले.



निवेदनात हिंगोली जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये प्रचंड क्रीडा क्षमता असूनही आधुनिक क्रीडा पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, सराव आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध होत नसल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

प्रस्तावित स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये अत्याधुनिक इनडोअर स्टेडियम, ४०० मीटर ॲथलेटिक्स ट्रॅक, जलतरण तलाव, आधुनिक व्यायामशाळा (जिम), स्पोर्ट्स सायन्स व फिजिओथेरपी सेंटर, खेळाडूंसाठी सुसज्ज वसतिगृह तसेच फुटबॉल, हॉकी, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस आदी विविध क्रीडा प्रकारांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी खासदार डॉ. रामराव वडकुते यांनी सांगितले की, या प्रकल्पाच्या उभारणीमुळे हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षणाची संधी मिळेल. नवोदित खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यास आवश्यक सुविधा उपलब्ध होतील. तसेच हिंगोली जिल्ह्याला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळेल.

यावर केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री मा. रक्षाताई खडसे यांनी निवेदनाची सकारात्मक दखल घेत संबंधित प्रस्तावाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# सिल्लोड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि सरकारी वकील कार्यालय स्थापन होणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच स्वतंत्र सरकारी वकील कार्यालय सुरू करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. विधि व न्याय विभागांतर्गत घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांना न्याय मिळवणे अधिक सुलभ होणार असून, न्यायालयाच्या सुव्यवस्थेसाठी आवश्यक असणारे न्यायिक अधिकारी व कर्मचारीवृंद यांची पदे मंजूर करून त्यासंबंधीच्या आवश्यक आर्थिक तरतुदीसही मान्यता देण्यात आली आहे.

# घाटीच्या शरीररचनाशास्त्र विभागाला आणखी एक देहदान; वर्षभरातील संख्या 29 वर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाला मंगळवारी आणखी एक देहदान प्राप्त झाले. यंदाच्या वर्षात विभागाला मिळालेल्या देहदानांची संख्या २९ वर पोहोचली असून, देहदानाविषयी वाढती जनजागृती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक संस्थांच्या सक्रिय सहभागाचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.



कै. सौ. अलका संजीव शिंदे (वय ५८, रा. तारांगण, नाशिक रोड, पडेगाव) यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार कुटुंबीयांनी देहदानाची प्रक्रिया पूर्ण केली. या देहदानामुळे वैद्यकीय शिक्षण, संशोधन तसेच भावी डॉक्टरांच्या प्रशिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळणार आहे.

हे देहदान जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान यांच्या सहकार्याने साकार झाले. संस्थानाचे जिल्हाप्रमुख भरकड यांनी या प्रक्रियेत विशेष समन्वय साधला. आजपर्यंत संस्थानाच्या माध्यमातून शरीररचनाशास्त्र विभागाला चार देहदान प्राप्त झाली आहेत. तसेच स्नेहसावली संस्थेच्या माध्यमातून चालू वर्षात दोन देहदान प्राप्त झाली आहेत.

शरीररचनाशास्त्र विभागाकडून आस्था फाउंडेशन, मातोश्री, स्नेहसावली, विविध समाजसेवी संस्था, वृद्धाश्रम आणि स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने देहदान जनजागृतीसाठी नियमित व्याख्याने, मार्गदर्शन कार्यक्रम आणि प्रबोधन उपक्रम राबविले जात आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरीररचनाशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या नेतृत्वाखाली देहदान जनजागृतीचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

आजच्या देहदानाची सर्व वैधानिक आणि विभागीय प्रक्रिया अत्यंत संवेदनशीलतेने व नियमानुसार पूर्ण करण्यात आली. या प्रक्रियेत सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण तसेच विभागातील खिल्लारे, मार्टिन, मिर्झा बेग आणि इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कोहिनूर महाविद्यालय खुलताबाद येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद येथील कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक एक ऑगस्ट रोजी मराठी विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथी निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. निलेश देगावकर यांनी साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कार्य व साहित्यावर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन व लेखन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश देवडे यांनी केले तर आभार प्रा. शांतीलाल गायकवाड यांनी मानले यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफीउल्लाह खान , डॉ. सुभाष जिते तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीव विद्यार्थी उपस्थित होते.



# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात नशा मुक्त युवा-विकसित भारत विषयावर प्रेरणादायी व्याख्यान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.४ ऑगस्ट :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'नशा मुक्त युवा-विकसित भारत' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.रामेश्वर मगर यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व,निरोगी जीवनशैली आणि विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना डॉ.मगर यांनी तंबाखू,मद्य,अमली पदार्थ तसेच इतर सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.व्यसनामुळे व्यक्तीची शारीरिक,मानसिक, आर्थिक व सामाजिक हानी होत असून त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होतो,असे त्यांनी सांगितले. युवकांनी आपल्या उर्जेचा उपयोग शिक्षण,संशोधन,क्रीडा, सामाजिक कार्य आणि राष्ट्रनिर्मितीसाठी करावा. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी व्यसनमुक्त,सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न आणि जबाबदार युवकांची फळी उभी राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.




या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजात जनजागृती करावी,असे आवाहन केले. उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत अशा जनजागृतीपर उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील चौधरे व डॉ.दिपक पारधे यांच्या नियोजनातून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.याप्रसंगी डॉ. पंकज गावित,डॉ.मनोजकुमार चोपडे,डॉ.ग्यानबा भगत,डॉ. संतोष पडघन,डॉ.शंतनू चव्हाण,डॉ.श्रीकृष्ण परिहार,डॉ. विनोद बारोटे,प्रा.रवींद्र जाधव,डॉ.शिवाजी शिरसाट यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# 35 वर्षानंतर भेटले जिल्हा परिषद प्रशाला शाळा सोयगाव येथील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या निसर्गरम्य परिसरात वसलेल्या सोयगावच्या जिल्हा परिषद प्रशालेच्या सन. १९९१ बॅच च्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन अजिंठा लेणीजवळ असलेल्या ॲपल हॉटेल फर्दापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने 35 वर्षानंतर भेट झालेल्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनींची संख्या ७० इतकी होती.यात विद्यार्थीनींची संख्या लक्षणिय होती.

कितीतरी वर्षांनी आपल्या वर्गमित्र मैत्रिणी यांना भेटून खुप आनंद झाला. आनंद व्यक्त करतांना अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.या कार्यक्रमाची सुरूवात या बॅच मधील काळाने घेऊन गेलेल्या मित्र व गुरूजन यांना एक मिनिट श्रद्धांजली वाहण्यात आली.




यानंतर सर्वांनी आपला वैयक्तिक परिचय,संध्याची प्रगती, कौटुंबिक माहिती,तसेच शालेय जीवनातील गमती जमती सांगून खळखळून सर्वांना हसविले.एकमेकांना आपल्या टोपन नावाने हाका मारल्या.कडकडून मिठी मारली आणि हे आनंदाचे अनमोल क्षण आपल्या डोळ्यात व कॅमेऱ्यात टिपले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोयगावचे नाट्य कलावंत सुनिल गुजर यांनी आपल्या खास खुमासदार विनोदी शैलीत मिमिक्री करत कार्यक्रमात रंगत आणली.

सहभोजनानंतर सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला

या कार्यक्रमासाठी जळगाव,जामनेर,सिल्लोड,बुलडाणा, नाशिक,मुंबईत,पुणे, छत्रपती संभाजीनगर तसेच इतर शहरांमधून उपस्थिती होती.

या स्नेहसंमेलनासाठी ज्ञानेश्वर(बाळू) बोरसे-पाटील, दुबई हून उपस्थित कांचन पाटील,कृषी भूषण अरुण सोहनी,डॉ.नाना पायघन,प्रफुल्ल महानोर,अरूणा चौधरी, संजय चौधरी,संजय जोहरे,मंगेश पाटील,निरंजन छानवाल, गोपाल दुसाने,डॉ.सुरेश शिंदे,विनोद खोडपे,साधना काळे, उज्वला काळे,रघुनाथ काटोले,वैशाली पाटील,गोकूळ रोकडे,दिपक देशमुख,सुभाष सोहनी,विजय व्यवहारे,दिपक राजपूत,सुनिल कळवत्रे,महेश जोशी,अशोक पाटील,अर्चना अंबिलवादे,मनिषा सरोदे,समाधान चौधरी,गजानन वाडेकर, विजय वामने,शांताराम बडक,दिगंबर भोकरे,गणेश मालोदे, भगवान भोकरे,रवि बाविस्कर,विनोद काळे आदीसह उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनासाठी बाळू बोरसे,कांचन पाटील,प्रफुल्ल महानोर आणि सोयगावमधील वर्गमित्र यांनी परिश्रम घेतले.

तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील गुजर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.नाना पायघन यांनी मानले.

## व्हॉइस ऑफ मीडियाच्या नवीन कार्यकारणीचा भारतीय जनता किसान मोर्चा जिंतूर च्या वतीने सत्कार

**जिंतूर प्रतिनिधी :** तालुक्यातील बोरी येथे भारतीय जनता किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजी उर्फ दिनकर चौधरी आयोजित व्हॉइस ऑफ मेडिया जिंतूर ची नूतन कार्यकारणी बिनविरोध निवड झाल्याबद्दल



पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती भाजपा ग्रामीण महिला मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष डॉ.विद्याताई चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती यशवंतराव चौधरी, भाजपा युवा नेते सतीश भाऊ चौधरी ग्रामपंचायत सदस्य पूजाताई शिंपले. भाजप मंडळ अध्यक्ष अशोक शिंपले बोरी प्रेस क्लबचे अध्यक्ष आनंदजी मुरक्या बोरी सोसायटीचे सचिव वामनराव शिंपले बाबुभाई काझी मामू सुधाकर थोरात संदीप इखे सह ज्येष्ठ पत्रकार भास्करराव चौधरी व मार्गदर्शक रामभाऊ ढाकरगे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष म्हणून अमृतराव चौधरी यांनी पदभार स्वीकारला

या कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती म्हणून व्हॉइस ऑफ मीडिया जिंतूर कार्यकारणीचे *नूतनअध्यक्ष सचिन रायपत्रीवार, सचिव दिलीप देवकर, कार्याध्यक्ष मुंजाजी कंठाळे, उपाध्यक्ष गणेशजी ठाकूर, सहसचिव तुकारामजी सर्जे, सह कोषाध्यक्ष संतोषी तायडे, सदस्य राजू गारकर, शिवानंद कंठाळे, संतोष लहाने, अशोक उकंडे* यासह निवड झालेल्या कार्यकारणीचे सत्कार भारतीय जनता किसान मोर्चा तालुकाध्यक्ष दिनकर चौधरी यांच्यासह भारतीय जनता पार्टी बोरी यांच्यावतीने सत्कार करण्यात आला

# एमजीएममध्ये 'क्लॅरिटी कॉन-2026' वैद्यकीय शिक्षण परिषद उत्साहात




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्ररोग विभाग आणि एमजीएम स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्सेसच्या ऑप्टोमेट्री विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'क्लॅरिटी कॉन-२०२६ - मास्टरिंग कॉन्टॅक्ट लेन्स' या विषयावरील वैद्यकीय शिक्षण परिषद व कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परिषदेत आधुनिक कॉन्टॅक्ट लेन्स तंत्रज्ञान, त्याचा वैद्यकीय वापर आणि रुग्णसेवेतील नव्या उपचारपद्धतींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

राज्यातील विविध भागांतून आलेले नेत्ररोगतज्ज्ञ, पदव्युत्तर विद्यार्थी, ऑप्टोमेट्रिस्ट आणि विद्यार्थ्यांसह ११० हून अधिक प्रतिनिधींनी परिषदेत सहभाग घेतला. व्याख्याने व लाइव्ह प्रात्यक्षिकांद्वारे आधुनिक कॉन्टॅक्ट लेन्सचे प्रकार, निवड, क्लिनिकल वापर, कॉर्नियल विकारांतील भूमिका आणि रुग्ण व्यवस्थापनाबाबत अद्ययावत माहिती देण्यात आली.

उद्घाटनप्रसंगी एमजीएम ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, प्रभारी अधिष्ठाता डॉ. मुसांडे, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अपर्णा कक्कड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राघवन, विभागप्रमुख डॉ. सारिका गाडेकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. डॉ. सुनैना मलिक, डॉ. मानसी बांग, डॉ. सुप्रिया देशपांडे आणि अन्य तज्ज्ञांनी आधुनिक कॉन्टॅक्ट लेन्सचे प्रात्यक्षिक सादर करून सहभागींच्या शंकांचे निरसन केले.

# डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप करत दिला समता व शिक्षणाचा संदेश

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज मंदिर ट्रस्ट, परभणी यांच्या वतीने डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त

1 ऑगस्ट रोजी अक्षदा मंगल कार्यालय परिसरातील सुयश नगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप , गरजू रुग्णांना फळ वाटप व अन्नदानाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले, तर गरजू रुग्णांना फळ वाटप व अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.




कार्यक्रमाचे उद्घाटन परभणी महानगरपालिकेचे महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल कांबळे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमहापौर गणेश देशमुख, नगरसेवक डॉ. केदार खटिंग,नगरसेवक जिजाभाऊ थोरात, व्यंकटराव शिंदे, आकाश साळवे, अंबादास तपसमुद्रे, कचरुजी आगळे आदी उपस्थित होते. तर प्रसिद्ध व्याख्याते ज्ञानेश्वर खटिंग यांनी प्रमुख व्याख्यानातून डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जागर केला.

यावेळी मान्यवरांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या शिक्षण, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या बळावर स्वतःचा आणि समाजाचा विकास साधावा, असे प्रतिपादनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रनबावळे यांनी केले. सूत्रसंचालन पी. जे. रनबावळे यांनी केले, तर आभार रामदास अवचार यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल रनबावळे,विलास रनबावळे, दिलीप वाघमारे, अशोक ससाणे, सूर्यभान पवार, वामन पवार, विठ्ठल बेदरे, रमेश बुचले, पिंटू मोरे, मधुकर वानखेडे, प्रा. मुळे सर, गजानन नरसिकर, लक्ष्मण लोखंडे, तुकाराम बोराडे, पृथ्वीराज जवळेकर, अफसर भाई, जलील भाई, मुखित भाई, राजेंद्र मोरे, बालाजी गरड, विश्वराज भालेराव आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी व समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात मका उत्कृष्टता केंद्र स्थापनेबाबत महत्त्वपूर्ण बैठक

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी.

**परभणी :**-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (National Agricultural Research Project – NARP) येथे आंतरराष्ट्रीय मका व गहू सुधारणा केंद्र (International Maize and Wheat Improvement Center – CIMMYT) यांच्या सहकार्याने "मका उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence for Maize)" स्थापन करण्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी व्हिलेज अँड सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (Village and Social Transformation Foundation – VSTF) च्या मुंबई येथील कार्यालयात संपन्न झाली.

या बैठकीचे आयोजन व्हिलेज अँड सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (Village and Social Transformation Foundation – VSTF) तसेच इंडो-मका आणि भरडधान्य विकास संघटना (Indo-Maize and Millets Development Association -IMMDA) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय मका व गहू सुधारणा केंद्र (CIMMYT) चे मुख्यालय मेक्सिको येथे असून, ही संस्था CGIAR या जागतिक कृषि संशोधन समूहाचा महत्त्वाचा घटक आहे. जगभरातील मका व गहू पिकांच्या संशोधन, सुधारित वाणांच्या विकास आणि शाश्वत कृषि तंत्रज्ञानाच्या प्रसारामध्ये या संस्थेचे उल्लेखनीय योगदान आहे.



या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे आभासी माध्यमाद्वारे सहभागी झाले. त्यांनी मका संशोधनाला बळकटी देण्यासाठी आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शाश्वत उत्पादनवाढ, हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धती आणि शेतकरी-केंद्रित संशोधनाला प्राधान्य देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच कृषि विद्यापीठे, आंतरराष्ट्रीय संशोधन संस्था, शासन यंत्रणा आणि इतर भागधारक यांच्या प्रभावी समन्वयातून मका पिकाची उत्पादकता, गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी संशोधन, नवतंत्रज्ञान विकास आणि त्याचा प्रभावी प्रसार अधिक वेगाने होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रस्तावित मका उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून मराठवाड्यासह राज्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना उच्च उत्पादक सुधारित वाण, अत्याधुनिक संशोधन सुविधा, आधुनिक कृषि तंत्रज्ञान, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि नवोन्मेषी तांत्रिक उपायांचा थेट लाभ मिळून मका उत्पादन अधिक सक्षम व स्पर्धात्मक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीस व्हिलेज अँड सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (VSTF) चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. उमाकांत दांगट, नोडल अधिकारी श्री चंद्रकांत माळी, समन्वयक श्री सुशांत पवार, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सूर्यकांत पवार, आंतरराष्ट्रीय मका व गहू सुधारणा केंद्र (CIMMYT) यांचे भारतातील कंट्री रिप्रेझेंटेटिव्ह व लीड डॉ. महेश गथाला, CIMMYT चे प्रमुख शास्त्रज्ञ तथा दक्षिण आशिया समन्वयक डॉ. परवेझ झैदी, इंडो-मका आणि भरडधान्य विकास संघटनेचे अध्यक्ष ॲड सूर्यकांत पाटील, ग्रँट थॉर्न्टनच्या तांत्रिक सेवा प्रदाता (Technical Service provider) श्रीमती शुभ्रा देशपांडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विविध राष्ट्रीय संशोधन संस्था आणि संबंधित विभागांतील मान्यवर शास्त्रज्ञ व तज्ज्ञ उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No : MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# चिस्तीया चौक–एमजीएम मार्गावरील उघडे चेंबर म्हणजे मृत्यूचा सापळा तातडीने दुरुस्तीची मागणी



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चिस्तीया चौकाकडून एमजीएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या वर्दळीच्या मार्गावर चेंबरचे झाकण पूर्णपणे तुटून मोठा खड्डा उघडा पडला असून नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. धोकादायक ठिकाणी प्रशासनाकडून केवळ एक काठी रोवून त्यावर लाल रंगाचे कापड बांधण्यात आले आहे. मात्र रात्रीच्या वेळी हा इशारा स्पष्ट दिसत नसल्याने दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच चारचाकी वाहनचालकांना अपघाताचा मोठा धोका आहे.

विशेष म्हणजे, हा मार्ग एमजीएम रुग्णालयाकडे जाणारा असल्याने दिवसभर रुग्णवाहिका, विद्यार्थी, नागरिक आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. चेंबरच्या आजूबाजूचा भागही खचल्यामुळे कोणतेही वाहन थेट खड्ड्यात जाऊ शकते. एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. मोठी जीवितहानी टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने मजबूत झाकण बसवून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक संपन्न; जिल्ह्यात नशामुक्त अभियानाला गती देण्याचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

अंमली पदार्थांचे सेवन, तस्करी आणि बेकायदेशीर व्यापार पूर्णपणे रोखण्यासाठी तसेच विविध शासकीय विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधण्याच्या उद्देशाने जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची (NCORD) महत्त्वाची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे शासन परिपत्रक आणि दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार जिल्हा व तालुका स्तरावर अंमली पदार्थांविरोधात प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या बैठकीत जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अंमली पदार्थांविरोधात सातत्याने कठोर कारवाई करून उत्पादन, वाहतूक, विक्री आणि सेवन या सर्व बाबींना आळा घालण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करण्याच्या स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या.

या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे उपअधीक्षक सचिन गाढवे यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, शिक्षण विभाग, न्यायवैद्यक प्रयोगशाळा, एमआयडीसी, पोलीस विभाग तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत युवा पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी व्यापक जनजागृती मोhiम राबवण्याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील सुमारे ८०० शाळांमध्ये अंमली पदार्थांविरोधात विशेष जनजागृती अभियान राबविणे, नशामुक्त पंधरवाडा साजरा करणे आणि पथनाट्यांच्या माध्यमातून वर्षभर जनजागृतीचे कॅलेंडर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये अंमली पदार्थविरोधी शपथ घेतली जाईल, तर पोलीस पाटील मेळाव्यांच्या माध्यमातून गावपातळीपर्यंत जनजागृती पोहोचविण्यात येणार आहे.

तरुणाईला या विळख्यापासून वाचवण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले असून, शाळा व महाविद्यालयांच्या शंभर मीटर परिसरात अंमली पदार्थांच्या प्रतिबंधाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे ठरविण्यात आले आहे. ई-सिगारेटचा वापर व विक्री प्रतिबंधित असल्याची व्यापक जनजागृती करून यासाठी ठिकठिकाणी जनजागृतीपर स्टिकर्स लावण्यात येणार आहेत. अंमली पदार्थांच्या विरोधातील या लढ्यात नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याने, नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती नार्कोटिक्स हेल्पलाईन क्रमांक ९१७५७७७६४६ वर न संकोचता त्वरित द्यावी, असे आवाहन या बैठकीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# वाळूज एस क्लब परिसरात लाट्या-काठ्यांनी तुफान हाणामारी; स्थानिकांमध्ये संताप



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज परिसरातील एस क्लब परिसरात काही तरुणांमध्ये लाट्या-काठ्यांनी तुफान हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या थरारक घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काही तरुण आपापसात एकमेकांवर लाट्या-काठ्यांनी जीवघेणा हल्ला करताना स्पष्टपणे दिसत आहेत. या दोन गटांमधील हाणामारी नेमकी कशामुळे झाली, याचे वृत्त लिहिस्तोवर कोणतेही ठोस कारण स्पष्ट झाले नसून, पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, या परिसराची एक मोठी समस्या समोर आली आहे. वाळूजच्या एस क्लब परिसरात अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या काही लोकांकडून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या सर्वसामान्य वाहनचालकांना आणि नागरिकांना रोज नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांनी केला आहे. वारंवार होणाऱ्या अशा प्रकारच्या त्रासामुळे आणि कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने आणि पोलिसांनी या प्रकरणी कठोर पावले उचलून अवैध वास्तव्यास असलेल्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

# 25 वर्षांची प्रतीक्षा संपली! वनविभागाच्या मंजुरीनंतर सावळदबारा रस्त्याचा मार्ग मोकळा दुसरीकडे बनोटी-निभोरा रस्त्याची मात्र प्रचंड दुरवस्था

फर्दापूर प्रतिनिधी फर्दापूर गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या प्रश्नांबाबत फर्दापूर सोयगाव परिसरात दोन चित्र पाहायला मिळत आहेत एका बाजूला २५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गोद्री पळसखेडा टिटवी सावळदबारा' रस्त्याला वनविभागाची मंजुरी मिळाल्याने कामाचा मार्ग मोकळा झाला आहे तर दुसरीकडे खान्देशला जोडणाऱ्या बनोटी गोंदेगाव निभोरा रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने ग्रामस्थ आणि वाहनचालक कमालीचे त्रस्त झाले आहेत



सावळदबारा रस्त्याचे काम लवकरच सुरू होणार; PWD कडून अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू

गेल्या २५ वर्षांपासून वनविभागाच्या लालफितशाहीत अडकलेल्या गोद्री पळसखेडा टिटवी सावळदबारा या रस्त्याच्या कामाला आता खऱ्या अर्थाने गती मिळाली आहे गोद्री ते पळसखेडा हा रस्ता वनक्षेत्रातून जात असल्याने मंजुरी मिळण्यात अनेक वर्षे अडथळे येत होते

असा झाला पाठपुरावा सुमारे तीन महिन्यांपूर्वी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी या रस्त्याची पाहणी केली होती त्यानंतर इद्रिस मुलतानी पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण आणि पं.स. सदस्य राहुल राठोड यांनी थेट मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन दिले होते मुख्यमंत्र्यांच्या तातडीच्या निर्देशानंतर आता वनविभागाची मंजुरी मिळाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे

नागरिकांना मोठा दिलासा या रस्त्यामुळे सावळदबारा परिसरातील १२ खेड्यांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे सध्या जामठी व परिसरातील नागरिकांना सावळदबारा मार्गे छत्रपती संभाजीनगर किंवा बुलढाण्याला जाण्यासाठी फत्तेपूर देऊळगाव गुजरी मार्गे ४० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराचा वळसा घालावा लागतो हा नवीन रस्ता पूर्ण झाल्यानंतर हे अंतर लक्षणीयरीत्या कमी होणार आहे

ठेकेदाराच्या मनमानीमुळे बनोटी गोंदेगाव निभोरा रस्त्याची प्रचंड दुरवस्था

एकीकडे सावळदबारा रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत असताना दुसरीकडे बनोटी खान्देशला जोडणाऱ्या बनोटी गोंदेगाव निभोरा पाचोरा रस्त्याचे मात्र तीनतेरा वाजले आहेत

रस्त्याला तलावाचे स्वरूप या रस्त्याचे डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या खड्ड्यांमध्ये पाणी साचून रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे ज्यामुळे वारंवार अपघात होत आहेतदळणवळणाचा एकमेव मार्ग पंचक्रोशीतील ग्रामस्थांना अनेक दैनंदिन आणि व्यावसायिक कामांसाठी पाचोरा जि. जळगाव तालुक्याला जावे लागते सोयगावला केवळ शासकीय कामासाठी जाणारे नागरिक वगळता उर्वरित सर्वांसाठी पाचोरा येथे जाण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे ठेकेदाराचे दुर्लक्ष संबंधित ठेकेदाराने गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिले आहे त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून कसरत करावी लागत असून प्रशासनाने या ठेकेदारावर कारवाई करून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे अशी संतप्त मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे

# अनावश्यक माहितीला 'नाही' म्हणण्याची सवय लावा; माहितीच्या थकव्यापासून दूर राहा : प्रा. अपर्णा अष्टपुत्रे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या 'इन्फॉर्मेशन फटीग' (माहितीचा थकवा) या समस्येपासून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अनावश्यक माहितीला 'नाही' म्हणण्याची सवय लावावी, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांनी केले.



एसबीईएस कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे भूमकर सभागृहात 'Reclaiming Balance- Digital Habits, Real Life Impact' या विषयावर आयोजित विशेष अतिथी व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संदीप चौधरी, डॉ. आनंद चौधरी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. अष्टपुत्रे यांनी व्यसनाची संकल्पना, मोबाईलच्या वाढत्या व्यसनामागील कारणे आणि त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शारीरिक हालचालींचा अभाव, प्रत्यक्ष संवादात होत असलेली घट आणि स्मार्टफोनवरील वाढते अवलंबित्व यामुळे भावनिक ताण वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट आणि यूट्यूबसारख्या सोशल मीडिया माध्यमांच्या सततच्या वापरामुळे मानसिक थकवा, एकाग्रतेचा अभाव आणि भावनिक असंतुलन वाढते. या समस्यांवर मात करण्यासाठी नियमित व्यायाम, प्रत्यक्ष संवाद, तंत्रज्ञानाचा मर्यादित व सजग वापर तसेच अनावश्यक माहितीपासून स्वतःला दूर ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. अमृता वाकळे यांनी केले. इंग्रजी विभागातील सर्व प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

# जडीबुटी दिनानिमित्त पतंजली योग समितीतर्फे औषधी वृक्षांचे वृक्षारोपण

**जिंतूर, प्रतिनिधी :** पतंजली योगपीठाचे महासचिव आचार्य बालकृष्णजी यांच्या प्रकटदिनानिमित्त त्यांच्या संकल्पनेनुसार 'जडीबुटी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने जिंतूर शहरातील साईप्रसाद नगरी येथे पतंजली योग समितीच्या वतीने यज्ञ, वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चारात यज्ञ करून करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आवळा, वड, दशपर्णी यांसारख्या औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षसंवर्धनासह आयुर्वेदाचा प्रसार आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश यावेळी उपस्थितांना देण्यात आला.

कार्यक्रमात भारत स्वाभिमान परभणीचे जिल्हा प्रभारी धोंडीराम शेप, बापू देशमुख, अॅड. देशपांडे, मिडिया प्रभारी सचिन रायपत्रीवार, पुरुषोत्तम अंभुरे, निवृत्त अभियंता हरीभाऊ केंद्रे, राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष आंधळे, ज्ञानेश्वर चक्रवार, किशनराव वटाणे, निलंगे अप्पा तसेच योग वर्गातील विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यावरण संवर्धन, आरोग्य संवर्धन आणि आयुर्वेदाचा प्रसार या संदेश देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# तालुका क्रीडा संकुलाच्या कामाचे भूमिपूजन आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

सोयगाव व परिसरातील युवक-युवतींना आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने ₹२ कोटी ९३ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या आधुनिक तालुका क्रीडा संकुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



ग्रामीण भागातील खेळाडूंनाही शहरांप्रमाणे दर्जेदार क्रीडा सुविधा मिळाव्यात, त्यांना सरावासाठी इतर ठिकाणी जावे लागू नये आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडावेत,या दूरदृष्टीतून आमदार अब्दुल सत्तार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच सोयगाव तालुक्याला आधुनिक क्रीडा संकुलाची ही मोठी भेट मिळाली आहे.

या कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर,कृउबा समितीचे संचालक केशवराव पा.तायडे,दारासिंग चव्हाण, धरमसिंग चव्हाण,शिवसेना शहर प्रमुख संतोष बोडखे, गटनेते अक्षय काळे,स्वप्निल पाटील,राजू दुतोंडे,कदीर शहा, हर्षल काळे,गजानन कुडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते,खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रकल्पाअंतर्गत ४०० मीटर धावपट्टी व बाह्य गटार,मल्टी गेम हॉलचे रंगकाम,फ्लोअरिंग,पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्था,अत्याधुनिक साऊंड सिस्टीम,छताच्या दोन्ही बाजूंना ड्रेनेज व्यवस्था,व्हॉलीबॉल व खो-खो मैदानांची उभारणी,मुख्य प्रवेशद्वार,संरक्षक कंपाऊंड भिंत तसेच इनडोअर खो-खो हॉलचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे सोयगाव तालुक्यात प्रथमच खेळाडूंना आधुनिक आणि सर्व सुविधांनी युक्त क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे.यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले की, "ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांना योग्य सुविधा आणि संधी मिळाल्यास ते राज्य व देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात.त्यामुळे मतदारसंघात विकासकामांसोबतच क्रीडा सुविधांनाही प्राधान्य देत असून, भविष्यातही युवकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील."

हे क्रीडा संकुल पूर्ण झाल्यानंतर सोयगाव तालुक्यातील खेळाडूंना आपल्या तालुक्यातच दर्जेदार सरावाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विविध तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास चालना मिळणार असून, युवक-युवतींना क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी नवे व्यासपीठ निर्माण होणार आहे. तसेच ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजण्यास, शारीरिक तंदुरुस्ती वाढण्यास आणि गुणवंत खेळाडू घडण्यास या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल.

# सायबर पोलिसांची कारवाई; CSAM सामग्री जतन आणि प्रसारित करणाऱ्या दोघांना अटक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

आयुक्तालयाच्या हद्दीत इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून बालकांचा समावेश असलेली लैंगिक स्वरूपाची आक्षेपार्ह सामग्री स्वतःच्या मोबाईलमध्ये जतन करून ती टेलिग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून प्रसारित आणि विक्री करणाऱ्या दोघा तरुणांना छत्रपती संभाजीनगर सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने जेरबंद केले आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर आयुक्तालयाच्या हद्दीत काही इसम सायबर माध्यमांचा गैरवापर करून CSAM सामग्री बाळगत असल्याबाबतची गोपनीय व तांत्रिक माहिती सायबर पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे प्राथमिक पडताळणी केल्यानंतर, शुभम राजेंद्र लोहाडे (वय २० वर्षे, रा. पाथरीकरनगर, हडको, छत्रपती संभाजीनगर) आणि पार्थ सुनील कुलकर्णी (वय २१ वर्षे, रा. सुभाषचंद्र बोस नगर, टीव्ही सेंटर, हडको, छत्रपती संभाजीनगर) हे दोन संशयित निष्पन्न झाले.

सायबर पथकाने तांत्रिक साधनांच्या साहाय्याने शोध घेतला असता, दोन्ही संशयितांना पोलीस ठाण्यात हजर राहण्याबाबत समजपत्र देण्यात आले. दोन्ही इसम सायबर पोलीस ठाण्यात हजर झाले. पोलिसांनी कसून चौकशी केली असता, त्यांच्या मोबाईलमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकांसंबंधित लैंगिक स्वरूपाची आक्षेपार्ह सामग्री आढळली. तसेच ते ही सामग्री ऑनलाईन पद्धतीने टेलिग्रामच्या माध्यमातून प्रसारित करत असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर दोन पंचांसमक्ष पोलीस निरीक्षकांच्या उपस्थितीत संशयितांचे मोबाईल हॅन्डसेट व टॅब जप्त करून सविस्तर पाहणी व जप्तीचा पंचनामा करण्यात आला.

या प्रकरणी शासकीय वाहनचालक पोलीस अंमलदार अविनाश हरिश्चंद्र रेशिमवाले यांच्या फिर्यादीवरून, संशयित आरोपींविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २९४, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (POCSO Act) कलम १५, आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) कलम ६७ (बी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे.

# सोयगाव तालुक्यातील गलवाडा(अ) येथील माजी सरपंच सुरेखा तायडे यांना 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार 2026' प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.४ ऑगस्ट :** पंडित जवाहरलाल नेहरू नाट्यगृह,पुणे येथे आनंदी फाउंडेशन आयोजित महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला.या सोहळ्यात सोयगाव तालुक्यातील गलवाडा(अ) येथील माजी सरपंच सुरेखा तायडे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय,उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण योगदानाबद्दल महाराष्ट्र गौरव पुरस्कार-२०२६ प्रदान करून गौरविण्यात आले.अभिनेत्री पूजा वाघ तसेच आनंदी फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष गणेश विटकर यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या सन्मानामुळे सोयगाव तालुका आणि गलवाडा(अ) गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून,राजकीय व मित्र परिवाराकडून तसेच सर्व स्तरांतून सुरेखा तायडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनेक महिलांना नवी प्रेरणा मिळाली असून,त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.




मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911